महिन्याचा विचार

गुरूदेवांची आम्हाला एकच शिकवण असे–आपलं आयुष्य एक प्रार्थना असावी, मानवतेच्या सेवेसाठी, भगवद प्राप्तीसाठी असावी! निस्वार्थ, निरहंकारी सेवा हीच खरी प्रार्थना असते. आयुष्यातील यशासाठी आणि अध्यात्मिक सरावासाठी! ईश्वराचे सर्वशक्तिमान असणे आणि सर्वव्यापी असणे हे स्वीकारण्यासाठी प्रार्थना असते. स्वत:चे दुबळे, दीन आणि मर्यादित स्वरूप स्वीकारण्यासाठीही! प्रार्थनेने या दुबळेपणावर मात करणे आणि ईश्वराचे दिव्यत्व पसरविणे हे दोन्ही शक्य होते. स्व–शरणागतीचा हिस्सा असते प्रार्थना आणि दैवताचे पूजन करण्याचा मार्गही. प्रार्थनेची जोपर्यंत सवय होत नाही, ती व्यक्तिमत्वात भिनत नाही तोपर्यंत, गुरूदेवांनी आम्हाला उपलब्ध असलेल्या कोणत्याही आधाराची मदत घेण्यास शिकवले. मंदिर, मूर्ती, प्रतिमा, ईश्वराचे चित्र, संतांचे पवित्र ग्रंथ इत्यादी. गुरूदेवांनी स्वत:चे उदाहरण आमच्या समोर ठेवले. ते स्वत: अद्वैतवादी विचारसरणीचे भोक्ते होते आणि या तत्वज्ञानावर त्यांचा ठाम विश्वास होता. मात्र दैनंदिन जीवनात ते पक्के पराभक्त होते आणि त्यांना प्रत्येक गोष्टीत भगवंताचे दर्शन होत असे. म्हणूनही त्यांनी भगवंताचे अस्तित्व मूर्तीत आणि चित्रामध्येही स्वीकारले.

त्यांच्या कक्षात, त्यांच्या कार्यालयात भगवंताचे चित्र असायचे, सत्संग भवनात अनेक देवी–देवतांचे फोटो असत. त्यांच्यासाठी हे केवळ चित्र नसे, पण भगवंताचे दृश्य स्वरूपातील प्रकट होणे असे. इतरांसारखे चित्र निव्वळ टांगून ठेवणे आणि नंतर त्याला विसरून जाणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. त्या चित्रांचे गुरूदेवांच्या दैनंदिनीमध्ये अस्तित्व जाणवायचे. कार्यालयात प्रवेश केल्या केल्या ते चित्रांकडे एक नजर टाकायचे –जणू ती चित्रे म्हणजे त्यांचे कार्यालयीन सहकारीच. बघितल्यावर त्यांच्या मनात येत असेल – ''मी येथे आलो आहे'', आणि नंतर कामाला लागत. एका विभागाचे काम संपले किंवा एक अभ्यागत जाऊन दुसरा येण्याच्या वेळात ते खुर्चीवर मागे रेलून आरामात बसत, एक नेत्र बंद करून दुसऱ्या नेत्राने समोरच्या चित्राकडे बघत. तो क्षणार्ध अमर्याद शांतता, आशीर्वचनाचा असायचा. भगवंताशी अनुसंधान सुरू असायचे. याबाबतीत ते इतके आग्रही असत की कोणी एखादे चित्र हलविले की ते त्यांच्या लगेच लक्षात येत असे आणि मग त्वरेने त्या चित्राची पुनर्स्थापना होत असे. खरं तर अशा गोष्टींची त्यांना काय गरज? स्वत: सतत ब्रह्माशी अनुसंधान असलेली ही व्यक्ती, तरीही त्यांचा हा हट्ट का असे? त्यांना फक्त स्वत:चे उदाहरण समोर ठेवायचे असे.

SWAMI KRISHNANANDA AS A SADHAKA IN SIVANANDA ASHRAM

By Sri Swami Chidananda

Arriving at Rishikesh in the year 1944, the brilliant young seeker came face to face with his Guru upon the holy banks of the sacred river Ganga. Filled with the spirit of renunciation, young Subbaraya met his worshipful holiness Satguru Sri Swami Sivananda filled with the radiant light of Divine Realisation. *The story of his first meeting with His Holiness Sri Swami Sivanandaji Maharaj, in whom the young man saw his spiritual preceptor, is told in an interesting manner by Gurudev himself (“He Is a Wonder to Me”).*

Though Subbaraya was devoted to the pursuit of Self-Knowledge and was a Bala-Jnani, he did not hesitate to joyously undertake, willingly do, with the efficiency of a master and with the delight of one interested, any work that was allotted to him by the authorities of the Ashram. *The Sivananda Charitable Dispensary needed an able hand to serve the sick that resorted to its medical aid; Swami Krishnanandaji was chosen for what he considered a blessed privilege.* He used to conduct the Ashram Satsanga and play the most important roles in it, chanting hymns, reading from the scriptures and delivering lectures. He was well-versed in the Mantras and therefore he willingly undertook

to conduct any ritual that was to be performed at the Ashram. *It was he who culled out Mantras from several sources and codified the Sannyasa Diksha ceremony now adopted in the Sivanandashram. He became the Programme Director of all the Sadhana Weeks; he managed them most efficiently and won the admiration of the hundreds of Sadhakas who took part in each Sadhana Week, for his punctuality, regularity, and capacity for intense and hard work. Any department of work at the Ashram that needed an able organiser to set matters right claimed Krishnanandaji as its own.* Beneath all this heavy load of strenuous work, he could put up a happy smile, and could, when not engaged in all this responsible work, meditate in absolute peace.

His needs were few, and wants were none. He had attained such a mental state that austerity was welcomed by him. *His mastery over the senses and his hard work soon earned for him the admiration of H.H. Sri Swami Sivanandaji himself,* who during the course of his talk to aspirants, on the *17th September, 1945, said: — "Though he is a young man, he is full of Vairagya. He has controlled his tongue. I have tested him in so many ways. There is a fire in his speech. His words come from his heart. He is a young man with spiritual Samskaras. He who has done spiritual Sadhana in the previous birth is born with such Samskaras.* He has done much work. He has translated several poems from Sanskrit."

दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- ✼ एप्रिल २०२४ चा सत्संग २८ तारखेला झाला.
- ✼ 'दिव्य जीवन'' या आपल्या मासिक पत्रिकेचा एप्रिल २०२४ चा अंक परिवारातील सदस्यांना पाठविण्यात आला.

पुणे शाखेचा पत्ता

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य' प्लॉट नं. ४९/सायंतारा, डी.एस.के.
विश्व, धायरी, पुणे ४११०६८,
मो.नं. ९८५०९३१४१७

बुक पोस्ट

प्रति

दिव्य जीवन

पुणे शाखा
वर्ष १९/अंक ०५
मे २०२४

"Though surrounded by pleasurable or painful objects to disturb your equilibrium of mind, remain immovable as a rock, receiving all things with equanimity. Be always cheerful. Laugh and smile. How can a mind that is gloomy and dull think of God ? Try to be happy always. Happiness is your very nature. This is termed cheerfulness. This spirit of cheerfulness must be cultivated by all aspirants."

-Swami Sivananda